# बृहन्मुंबई महानगरपालिका

**क्र.स.आ. / ए / 075 /व्यय. दि. 25.08.2022**

## <u>निविदा सुचना</u>

**विषय -** दि 01.09.2022, 04.09.22, 05.09.22, 06.09.22 आणि 09.09.2022 रोजी गणपती विसर्जन कामाच्या वेळी कर्मचा-यांना जेवण व चहा खर्चासाठी मोहोरबंद स्थळ दरपत्रिका मागविणेबाबत.

'ए' विभागातील विविध ठिकाणी गणपतीच्या विसर्जनाच्या कामाकरीता दि 01.09.2022, 04.09.22, 05.09.22, 06.09.22 आणि 09.09.2022 रोजी सहाय्यक अभियंता (परिरक्षण) 'ए' विभाग, सहाय्यक मुख्य पर्यवेक्षक (घ.क.व्य.), 'ए' विभाग व वैद्यकीय आरोग्य अधिकारी 'ए' विभाग यांचे कामगार / कर्मचारी व अधिकारी पूर्ण दिवसांत 2 पाळयांमध्ये एकूण- 260 कामगार / कर्मचारी (अंदाजे), 'ए' विभागातील चार विसर्जनस्थळी नियुक्ती करण्यात येणार आहे. तरी सदर नियुक्ती केलेल्या कामगार/ कर्मचारी व अधिकारी यांना उपरोक्त तारखेला जेवण व चहापाण्यासाठी खाजगी कंत्राटदार नेमण्याकरिता स्थळ दरपत्रिका मागविण्याचे प्रस्ताविले आहे. सदर स्थळ दरपत्रिका दि. 26.08.2022 व 29.08.2022 रोजी दुपारी 2.00 वाजे पर्यन्त कार्यालयीन वेळेत,स्थळ दरपत्रिका अर्ज रु. 220/- + 18% जीएसटी इतकया व रु. 6000/- EMD सह, नागरिका सुविधा केंद्रात भरणा केल्यानंतर, सहाय्यक आयुक्त, ए विभाग, मुख्य लिपिक, (व्यय), 134-ई, शहीद भगतसिंग रोड, फोर्ट मुंबई-01 या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येतील. तसेच सदर स्थळ दरपत्रिकेची सोडत दि. 29.08.2022 रोजी दुपारी 3.30 या वेळेत करण्यात येणार आहे. प्राप्त स्थळ दरपत्रिका मधून लघुतम दरपत्रिका स्विकृत केली जाईल.

सदर निविदा कोणत्याही कारणास्तव स्वीकारणे अथवा नाकारणे याची जबाबदारी सर्वस्वी मा. सहहयक आयुक्त, 'ए' विभाग यांची असेल.

Sd/-

**सहाय्यक आयुक्त, 'ए' विभाग (प्र)**